-: प्रेस नोट :- दिनांक २३.०९.२०१९

-: स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण :-

**महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने कलबुर्गी (गुलबर्गा)जिल्हा,पोलीस दल,राज्य कर्नाटक व सोलापुर ग्रामीण पोलीस दल यांचेत समन्वय राहाणेसाठी सोलापुर ग्रामीण पोलीस दलातर्फे आयोजीत केलेली आंतरराज्य गुन्हे बैठक पार पडली**

---

दिनांक २३.०९.२०१९ रोजी १६.३० वा पोलीस अधिक्षक, कार्यालय सोलापुर ग्रामीण येथील मिटींग हॉलमध्ये महाराष्ट्र राज्य, विधानसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने सोलापुर ग्रामीण पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराज्य गुन्हे बौठकीस अपर पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण श्री. अतुल झेंडे, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री अत्तार, पोलीस उपअधिक्षक, अर्थीक गुन्हे शाखा श्री. चिखले, उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट विभाग श्री. डॉ. गायकवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, श्री. सावंत, पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा, श्री. पाडुळे व अक्कलकोट उत्तर, वळसंग, मंद्रुप, सोलापुर तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी तसेच कलबुर्गी जिल्हा, राज्य कर्नाटक येथील अपर पोलीस अधिक्षक, श्री. प्रसन्ना देसाई, उप विभागीय पोलीस अधिकारी आळंद उपविभाग श्री. सुलपी तसेच आळंद,मादनहिप्परगा, रिवर, अफजलपुर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी उपस्थीत होते.

उपस्थीत सर्व अधिकारी यांची अपर पोलीस अधिक्षक, श्री. अतुल झेंडे यांनी स्वागत करून बौठकीस सुरवात झाली सदर बौठकीस विधानसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने नेमण्यात येणारे स्थिर तपासणी नाके (एस.एस.टी.) व फ्लाईंग स्कॉड बाबत चर्चा होवुन, निवडणुक दरम्यान सिमावर्ती भागातुन पैश्याची तस्करी,अवैध दारू तस्करी,अवैध शस्त्र तस्करी व इतर बेकायदेशीर वाहतुक होवु नये म्हणुन नेमणेत आलेले आंतरराज्य चेकपोस्ट बाबत चर्चा झाली. दोन्ही जिल्हयातील उघडकीस न आलेले खुन, बेवारस मयत व मिसींग व्यक्ती तसेच पाहीजे फरारी आरोपी, वॉरंट बजावणी यांचे माहितीची देवाण घेवाण करण्यात आली.

अपर पोलीस अधिक्षक, कलबुर्गी श्री. प्रसन्ना देसाई यांनी आंतरराज्य गुन्हेगार, फरारी व पाहीजे आरोपी, नॉन बेलेबल वॉरंट मधील आरोपी पकडणेबाबत संयुक्त मोहीम राबविणेबाबत सुचवुन. आंतरराज्य बौठका या निवडणुक काळापुरत्या न घेता कायस्वरूपी संमन्वय राहाणेसाठी किमान तिन महिण्यातुन एकदा घेण्यात यावे असे सुचविले. त्यावर अपर पोलीस अधिक्षक,सोलापुर ग्रामीण श्री. अतुल झेंडे यांनी सिमावर्ती भागातील पोलीस ठाणे स्तरावर दोन महिण्यातुन एखदा उपविभागीय स्तरावर तिन महिण्यातुन एखदा व जिल्हा स्तरावर सहा महिणतुन एखदा दोन्ही राज्यमध्ये पोलीस दलामध्ये समन्वय राहणेसाठी आंतरराज्य बौठका घेण्याचे ठरले आहे.

यानंतर बौठकीस उपस्थीत असणारे सर्व अधिकारी यांचे सपोनि श्री. डॉ. थेटे यांनी अभार मानुन व बौठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

-- ०० --

Scanned by CamScanner